

प्रेरणास्थान
श्री. सुरेशदादा जैन

SEED

Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री श्रीमती प्रेमाबाई भिकमचंदजी जैन
उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

# ज्ञानयज्ञ

**आमचे ध्येय:**
*गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.*



10 YEARS
Empowering Students since 2008

## आमची दशकपूर्ती
## तुमची स्वप्नपूर्ती

## एसडी-सीड विद्यार्थी दत्तक योजना
(तपशील पान ३ वर)

वर्ष ६ | अंक १८ | सप्टेंबर–डिसेंबर २०१७

# “ कमवा आणि शिका ”





> स्वतः काम करून पैसे कमावल्याने व्यक्ती शिस्तबद्ध बनते. त्याला वेळ, पैसा आणि पालक यांचे मूल्य जाणवते. मानवी संबंध आणि समाज संस्कृती समजायला मदत होते. हा पालकांप्रती खऱ्या अर्थाने आभार व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे. थोडक्यात 'कमवा आणि शिका' आम्हाला एक परिपूर्ण पुरुष किंवा स्त्री बनण्यास मदत करते.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

सप्रेम नमस्कार. आपणास जीवनात यशस्वी होण्यात रस आहे का? या प्रश्नाचं उत्तर होकारार्थी असेल तर तुम्हाला एक विचार – एक दृष्टीकोन देऊ इच्छितो. आधी वाचा, त्यावर विचार करा आणि त्यात तथ्य आढळल्यास प्रत्यक्ष अंमलात आणा.

अठरा वर्षे वयाचे झाल्यानंतर यशाचा मंत्र आहे 'कमवा आणि शिका.' आपण कोणत्यातरी शिक्षण संस्थेत शिकण्यासाठी प्रवेश घेतला आहे. या शिकण्यासोबत जोपर्यंत आपण पैसे कमवत नाही, तोपर्यंत आपलं शिकणं परिपूर्ण होत नाही. जीवनाच्या पहिल्या टप्प्यात जेव्हा आपण दुसऱ्यासाठी काम करतो किंवा दुसऱ्याला सेवा देतो तेव्हा आपणास उत्पन्न मिळते. महाविद्यालयात शिकण्यासाठी पुस्तकं वाचल्याने आपणास ज्ञान मिळते आणि उत्पन्न मिळविण्यासाठी काम केल्याने कौशल्य प्राप्त होते. ज्ञान आणि कौशल्य एकमेकांना पूरक आहेत. अभ्यासामुळे सैद्धांतिक पाया (Theoretical Base) मजबूत होतो तर काम केल्याने व्यवहार समजतो. फक्त महाविद्यालयीन शिक्षणाने किंवा फक्त उत्पन्न मिळवल्याने व्यक्तीला पूर्णत्व प्राप्त होत नाही. शिकणं आणि उत्पन्न मिळवणं हे दोन्ही सारखेच महत्त्वाचे आहे. एक–दुसऱ्याशिवाय ते अपूर्ण आहे. जेव्हा आपण पैसे घेतो तेव्हा काम व्यवस्थित पूर्ण करण्यास आपण जबाबदार असतो. जेव्हा आपण हौस म्हणून काम करतो तेव्हा तो जबाबदारीचा भाव पूर्णपणे येईलच याची शाश्वती नसते. जीवन हे व्यावहारिक आहे, केवळ एक सिद्धांत नाही. यशस्वी जीवन हे संतुलित जीवन आहे. जाणून घेणे आणि करणे, भावना आणि तर्कशास्त्र (Emotions & Logic), शारीरिक आरोग्य आणि मानसिक आरोग्य, आदर्शवाद आणि व्यावहारिकता (Idealism & Pragmatism), सामुदायिक जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य, आंतरिक विकास आणि बाह्य वाढ यादरम्यान संतुलन खूप आवश्यक आहे. जेव्हा आपण एकाच वेळी शिकतो आणि कमावतो तेव्हाच वरील सर्व गोष्टींमध्ये संतुलन शक्य आहे.

एखाद्याच्या मनात एक प्रश्न असू शकतो. जेव्हा पालक आर्थिकदृष्ट्या चांगल्या प्रकारे पैसे कमवतात आणि आपल्या मुलांना पैसे देतात तेव्हा मुलांनी काम करून पैसे का कमवावे? मूलत: शिक्षण ही आम्हाला आत्मनिर्भर बनवण्याची आणि आपल्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची एक प्रक्रिया आहे. जेव्हा आपण इतरांच्या दुकानात स्वत:ला मालक समजून काम करतो तेव्हाच आपण खरं शिकतो. आपल्या पालकांच्या दुकानात काम करताना अहंभाव सुटणार नाही. जॉब एक्सपोजरमुळे आपल्याला कौशल्य आणि शहाणपण प्राप्त होते. कोणत्याही सैद्धांतिक अभ्यासाला व्यवहारात उतरवल्याशिवाय पूर्णत्व प्राप्त होत नाही. जसे कोणतेही झाड एखाद्या मोठ्या झाडाच्या सावलीत वाढू शकत नाही तसे श्रीमंत पालकांच्या सर्वकाही रेडीमेड उपलब्ध करून दिल्यामुळे बालक खऱ्या अर्थाने वाढू शकत नाही. स्वत: काम करून पैसे कमावल्याने व्यक्ती शिस्तबद्ध बनते. त्याला वेळ, पैसा आणि पालक यांचे मूल्य जाणवते. मानवी संबंध आणि समाज संस्कृती समजायला मदत होते. हा पालकांप्रती खऱ्या अर्थाने आभार व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे. थोडक्यात 'कमवा आणि शिका' आम्हाला एक परिपूर्ण पुरुष किंवा स्त्री बनण्यास मदत करते. ज्या पालकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो त्यांच्या पाल्यांना 'कमवा आणि शिका' हे एक वरदानच आहे. म्हणून आनंदी राहा आणि शिकणे आणि कमाईचा आनंद घ्या!

आपणां सर्व विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षण अखंडीतपणे पूर्ण व्हावे यासाठी एसडी–सीड नेहमीच सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या अनुषंगाने आपणांस शैक्षणिक क्षेत्रात प्रेरणा मिळावी म्हणून संबंधित तसेच इतर क्षेत्रातील आजवरचे प्रतिष्ठित शैक्षणिक विचारवंत व आदर्श व्यक्तीमत्व, उदा. महात्मा गांधी, रविंद्रनाथ टागोर अशा व्यक्तीमत्वांनी शिक्षणाबद्दल व्यक्त केलेले त्यांचे विचार म्हणजेच 'गुरूंची शिकवण' ही सीरीज आम्ही या अंकापासून प्रकाशित करीत आहोत. आपणांस नक्कीच याचा लाभ होईल, अशी मला खात्री आहे.

एसडी–सीडच्या वतीने आपणां सर्वांना नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

– प्राचार्य डॉ. विवेक काटदरे
**एसडी–सीड सल्लागार समिती सदस्य**

**या अंकात...** | **पृष्ठ क्र.**

| या अंकात... | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. संपादकीय | २ |
| २. शिष्यवृत्ती वितरण सोहळा–२०१७ | ३ |
| ३. सोहळ्यातील निवडक क्षणचित्रे | ४ |
| ४. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | ५ |
| ५. वाचनाची सवय | ६ |
| ६. गुरूंची शिकवण | ७ |
| ७. लाभार्थ्यांचे मनोगत | ८ |

## ज्ञानयज्ञ संपादक मंडळ

श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी



## "आयुष्यभर विद्यार्थी बनून रहा. त्यामुळे निवडलेल्या क्षेत्रात निश्चितपणे उंची गाठाल"

### एसडी–सीड शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात प्रमुख वक्त्यांचा यशाचा कानमंत्र

एसडी–सीडतर्फे २०१७ सालातील शिष्यवृत्ती वितरण सोहळा नुकताच जळगाव येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला. या कार्यक्रमाला मान्यवर, विद्यार्थी व पालक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मागील दहा वर्षांपासून यशस्वीरित्या सुरू असलेल्या या उपक्रमांतर्गत १२,५०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. त्यातील ३००० विद्यार्थ्यांनी त्यांचे उच्चशिक्षण पूर्ण करून ते त्यांच्या व्यावसायिक करिअरमध्ये यशस्वी आहेत. त्यापैकी बरेच विद्यार्थी सरकारी किंवा खाजगी क्षेत्रात वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत.

**श्री. अविनाश धर्माधिकारी**, माजी सनदी अधिकारी तथा चाणक्य मंडळ परिवाराचे संस्थापक यांची या १० सोहळ्याला प्रमुख वक्ता म्हणून उपस्थिती लाभली. शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात निवड झालेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी काही निवडक लाभार्थ्यांना त्यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

### प्रमुख वक्त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर केलेल्या भाषणाचे निवडक मुद्दे

#### ★ जीवन आणि करिअर घडविण्याचे त्रिसूत्र

१. **'स्वओळख'** – प्रत्येकजण बुद्धिमान आहे, पण प्रत्येकाने आपली बुद्धी कुठे चालते ते ओळखले पाहिजे. दुसऱ्याकडे पाहून कोणत्या क्षेत्रात जायचे, हे ठरवू नका.

२. **'स्वनिर्णय'** – स्वत:चे मन कशात रमते व स्वत:ची क्षमता यावर क्षेत्र निवडा. जीवनाची दिशा त्यानुसार ठरवा व जागतिक स्पर्धेत तयार व्हा.

३. **'समर्पित'** – जागतिक पातळीवरील स्पर्धेचा विचार करून निवडलेल्या क्षेत्रात पूर्णपणे पारंगत, उत्तम व प्रतिभावंत व्हा. त्या क्षेत्रासाठी स्वत:ला समर्पित करा, यशस्वी जीवनाची पायाभरणी या टप्प्यातच होते.

#### ★ आवडीच्या क्षेत्रात विद्यार्थी बनून रहा

कुठलीही शाखा कमी नाही, सगळे क्षेत्र समान आहेत. आवडीने निवडलेल्या क्षेत्रात विद्यार्थी बनून राहिल्यास त्या क्षेत्रात निश्चितपणे उंची गाठाल.

#### ★ जिद्द, प्रेरणा असली तर गरिबी करिअर अडवू शकत नाही

कष्ट व परिश्रम न करता एखादी गोष्ट बसल्या जागी मिळाली त्याला मोल नाही, मात्र बुद्धिमत्ता व कर्तृत्वाने मिळालेल्या यशाला कुठेही अडथळा येत नाही. ज्याच्याकडे जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रम करण्याची तयारी आहे, त्याच्या करिअरमध्ये कुठेही गरिबी हा अडथळा ठरत नाही.

#### ★ अपयश हीच यशाची पायरी

आपण जे मिळवू ते स्वकर्तृत्वाने मिळवायला पाहिजे. प्रामाणिकपणे मिळविलेल्या संपत्तीलाही पारिजातकासारखा सुगंध असतो. अपयश आल्यावरच तो यशस्वी होतो.

## एसडी-सीड विद्यार्थी दत्तक योजना

एसडी–सीडतर्फे मागील दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येत आहे. लाभार्थी निवडण्याचे निकष, शिष्यवृत्तीसाठी आलेल्या प्रत्येक अर्जाची सखोल छाननी, योग्य लाभार्थ्यांची निवड आणि पुढे प्रत्येक लाभार्थ्यांचा शैक्षणिक ट्रॅक ठेवण्यासाठी करण्यात आलेली सॉफ्टवेअरची निर्मिती. ह्या सगळ्या गोष्टी विचारात घेता अनेकजण एसडी–सीडकडे विद्यार्थी हितासाठी काम करणारी एक विश्वासार्हता संस्था म्हणून पाहत आहेत. अनेकांनी आमच्याकडे विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याची इच्छा व्यक्त केली व आणि एसडी–सीडच्या माध्यमातून त्यांना विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले. अशा प्रकारे लोकसहभागातून या योजनेची सुरूवात झाली.

विद्यार्थी दत्तक घेणारी इच्छुक व्यक्ती रू.५००० पासून ते आपल्या स्वेच्छेनुसार रक्कम या योजनेसाठी देवू शकते. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना एसडी–सीड शिष्यवृत्तीव्यतिरिक्त अतिरिक्त आर्थिक मदत मिळण्यासाठी या रकमेचा लाभ होणार आहे. यामुळे या योजनेचा सकारात्मक हेतू पाहता याचवर्षी सुरू झालेल्या या योजनेला बऱ्याच लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

संबंधित योजनेद्वारे विद्यार्थी दत्तक घेण्याची प्रक्रिया, योजनेच्या अटी व शर्ती, विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या अभ्यासक्रमाचा वार्षिक खर्च तसेच इतर विस्तृत माहिती आमच्या www.sdseed.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## एक दृष्टीक्षेप...

### दीप प्रज्वलन







### प्रमुख अतिथींचे भाषण व उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व पालक वर्ग






### मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप





### प्रमुख अतिथी व इतर मान्यवरांसोबत शिष्यवृत्ती लाभार्थी



मागील चार महिन्यात एसडी–सीडने विद्यार्थ्यांमधील सुप्त कौशल्यांचा विकास होण्यासाठी तसेच शिक्षक आणि पालकांसाठीसुध्दा योग्य ते समुपदेश व्हावे या उद्देशाने शिक्षण प्रणालीमधील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या तिन्ही घटकांवर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करून शिक्षणाचा दर्जा वाढावा यासाठी एकूण १८ प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. त्यात १९७१ विद्यार्थ्यांनी आणि ६० शिक्षकांनी प्रशिक्षणांचा लाभ घेतला.



**स्मार्ट गर्ल – (चार कार्यक्रम)**

मार्गदर्शक: १. श्री. रत्नाकर महाजन, २. सौ. सुजाता अत्तरदे आणि ३. सौ. मिनल अत्तरदे

ठिकाण: १. महाराणा प्रताप उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
२. या. दे. पाटील माध्यमिक विद्यालय, जळगाव
३. स्व. के. सी. महाजन उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
४. जयदुर्गा माध्यमिक विद्यालय, जळगाव

उपस्थिती: एकूण २५६ विद्यार्थीनींचा सहभाग



**करिअर मार्गदर्शन** – (तीन कार्यक्रम)

मार्गदर्शक: श्री. प्रवीण सोनवणे, एसडी–सीड असोसिएट

ठिकाण: १. या. दे. पाटील माध्यमिक विद्यालय, जळगाव
२. स्व. के. सी. महाजन उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
३. जयदुर्गा माध्यमिक विद्यालय, जळगाव

उपस्थिती: एकूण ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग



**वेळेचे नियोजन**

मार्गदर्शक: डॉ. नरसिंग परदेशी

ठिकाण: रायसोनी कॉलेज पॉलिटेक्निक, जळगाव

उपस्थिती: एकूण २१० विद्यार्थ्यांचा सहभाग

**स्मृती आणि एकाग्रता विकास**

मार्गदर्शक: श्री. अभिजीत कुलकर्णी

ठिकाण: अरूणामाई कॉलेज ऑफ फार्मसी, ममुराबाद, जळगाव

उपस्थिती: एकूण १७० विद्यार्थ्यांचा सहभाग



**पब्लिक स्पिकींग**

मार्गदर्शक: डॉ. नरसिंग परदेशी

ठिकाण: त्रिमुर्ती इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी, जळगाव

उपस्थिती: एकूण १७५ विद्यार्थ्यांचा सहभाग



**प्रेरणादायी व्याख्यान**

मार्गदर्शक: कु. तनय मल्हारा

ठिकाण: महाराणा प्रताप माध्यमिक विद्यालय, जळगाव

उपस्थिती: एकूण १३० विद्यार्थ्यांचा सहभाग

**बिझनेस रायटींग**

मार्गदर्शक: डॉ. विवेक काटदरे

ठिकाण: ॲड. बबनभाऊ बाहेती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

उपस्थिती: एकूण ११० विद्यार्थ्यांचा सहभाग



**इंग्रजी संभाषण कौशल्य विकास**

मार्गदर्शक: प्रा. एन. जे. गादीया

ठिकाण: नंदिनीबाई वामनराव मुलींचे महाविद्यालय, जळगाव

उपस्थिती: एकूण ११० विद्यार्थ्यांचा सहभाग

**शिक्षक प्रशिक्षण**

मार्गदर्शक: १. श्री. निलकंठराव गायकवाड, आणि २. प्रा. सुरेश पांडे

ठिकाण: महाराणा प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव

उपस्थिती: एकूण ६० शिक्षकांचा सहभाग




# वाचनाची सवय आणि समाजात त्याचे महत्त्व

"मी ऑफिसमध्ये असेन, घरी असेन किंवा प्रवास करत असेन, माझ्याजवळ नेहमी अशा पुस्तकांचा संच असतो जी वाचण्यासाठी मी उत्सुक असतो."

**- बिल गेट्स (सह-संस्थापक आणि अध्यक्ष - मायक्रोसॉफ्ट)**

## परिचय

संपूर्ण जगभरात वाचनाविषयी जागरूकता वाढत आहे आणि पटवून दिले जात आहे की वैयक्तिक नागरिकांच्या जीवनामध्ये वाचन हे मूलभूत अंगापैकी एक आहे आणि किती महत्वाचे आहे. तंत्रज्ञानातील बदलत्या जगात नवनवीन ज्ञान अवगत करण्यासाठी प्रत्येकाला वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे. वाचन हे एक कौशल्य आहे. हळूहळू आपण वाचनासाठी वेळ वाढवत गेलात तर पुढे आपल्याला त्यात रूची निर्माण होवून वाचन करण्यामध्ये भरपूर वेळ घालविणे हा आपला एक आवडीचा छंद बनून जाईल. माध्यमे, माहितीपत्रे, पुस्तके, टीव्ही, रेडिओ आणि संगणकांद्वारे माहिती प्राप्त करण्यासाठी तसेच नवीन ज्ञान आणि कौशल्य प्राप्त करण्यासाठी व सतत शिक्षणासाठी वाचन हे सर्वात महत्वाचे घटक आहे. प्रत्येकासाठी आयुष्यभराच्या ज्ञानाचे हे एक अत्यावश्यक साधन आहे ज्याद्वारे तो आपल्या भावी पिढीला माहिती प्रसारित करू शकतो.

## वाचनाचे महत्त्व

वाचन ही अर्थपूर्ण पद्धतीने प्रिंटमधून संदेश प्राप्त करून माहिती घेण्याची एक महत्वाची प्रक्रिया आहे. निरोगी बौद्धिक वाढीसाठी चांगले वाचन करण्याची सवय आवश्यक आहे. वाचन ही एक सवय असावी, एकवेळचा अनुभव नसावा. वाचन करण्याची सवय एखाद्या व्यक्तीला व्यावहारिक कार्यक्षमता साधण्यास सक्षम करण्यामध्ये फार महत्वपूर्ण भूमिका बजावते.

## वाचनाचे फायदे

वाचनाची सवय आपल्याला बऱ्याच मार्गांनी लाभते. नियमित वाचन सवयीमुळे आपल्याला अनेक प्रकारे फायदा होतो, जसे:

- **शब्दसंग्रह सुधारतो**
- **एकाग्रता सुधारते**
- **स्वत:विषयी चांगले मत निर्माण करते**
- **स्मरणशक्ती सुधारते**
- **क्रिएटीव्हीटी सुधारते**
- **तर्क कौशल्य सुधारते**
- **ताण कमी होतो**

## वाचनाची सवय लागण्याचे मार्ग

बहुतेक लोकांना असे वाटते की आपण खूप वाचावे, परंतु प्रत्यक्षात त्यांना वाचन करताना फार कंटाळा येतो. वाचन ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्याने आपण आनंददेखील उपभोगतो व ज्ञानदेखील प्राप्त करतो. वाचन आपल्याला अधिक ज्ञानी आणि यशस्वी होण्यास मदत करते. तरीसुद्धा वाचनामध्ये बऱ्याच लोकांना रस नसतो व त्याला ते जास्त महत्वदेखील देत नाहीत. म्हणून आपल्यामध्ये वाचनाची सवय लागावी, त्यामध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून काही मार्ग आहेत.

- सर्वप्रथम वाचनासाठी पूर्ण दिवसात ठराविक वेळ निश्चित करा. आपण दिवसातून किमान ५–१० मिनीटे तरी वाचन करू शकू याप्रमाणे ती वेळ ठरवा. याचबरोबर आपल्याला वाचनाचे उद्दिष्टदेखील ठेवावे लागेल. हे उद्दिष्ट म्हणजे एक महिना किंवा दर आठवड्याला एक पुस्तक याप्रमाणे असू शकते.
- दुसरे म्हणजे नेहमी एकतरी पुस्तक आपल्यासोबत ठेवा. आपण कुठेही जावोत, एखादे पुस्तक आपल्याकडे सतत असावे. त्याचबरोबर आपल्याकडे नेहमी दोन याद्या असणे आवश्यक आहे. आपण आतांपर्यंत वाचलेल्या पुस्तकांची एक यादी तसेच भविष्यात आपल्याला कोणती पुस्तके वाचायची इच्छा आहे त्याची एक यादी.

## निष्कर्ष

वाचन सवयीला प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे, ज्यामुळे लोक मानसिकदृष्ट्या प्रगती करतील आणि गावापासून विद्यापीठापर्यंत प्रत्येक पातळीवर त्यांची क्षमता पूर्ण करतील. विस्तृतपणे वाचन केल्याने बौद्धिक वाढ होते. ही वाढ न करता कोणीही त्याच्या क्षमतेची पूर्तता करू शकत नाही. विस्तृत वाचन करून आपली बौद्धिक वाढ करणे हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे आणि यामुळे देशाचा आर्थिकदृष्ट्या लाभ होईल तसेच वैयक्तिकरित्या देखील संबंधित व्यक्तीचा फायदा होईल.


## सहकारातून सहकार्य



आपणांस कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, जळगाव तालुक्यातील एसडी–सीड शिष्यवृत्तीप्राप्त लाभार्थी कु. जितेंद्र महाजन याने B.E. Instrumentation मध्ये शिक्षण पूर्ण करून आज तो पुणे येथील नामांकित संस्थेत सिनीअर इंजिनीअर म्हणून कार्यरत आहे. त्याच्या बिकट परिस्थितीत शिक्षण पूर्ण करण्यासाठी एसडी–सीडने त्याला वेळोवेळी केलेली शिष्यवृत्तीरूपी आर्थिक मदत व समाजाप्रती असलेली त्याच्या जबाबदारीचे भान ठेवत आज त्याने एसडी–सीडला आर्थिक योगदान देण्याची इच्छा व्यक्त केली. एसडी–सीडला पाठविलेल्या पत्रात तो म्हणतो की, **मला आनंद आहे की मी एसडी–सीडचा एक शिष्यवृत्तीप्राप्त लाभार्थी होतो. माझ्या कठीण समयी मला आर्थिकदृष्ट्या आधार दिल्याबद्दल मी आपल्या संस्थेचा अत्यंत ऋणी आहे. त्याची परतफेड म्हणून मी संस्थेला आर्थिक योगदान देवू इच्छितो. जेणेकरून माझ्यासारखे जास्तीत जास्त गरजवंत व गुणवंत विद्यार्थी अखंडीतपणे त्यांचे शिक्षण पूर्ण करू शकतील.**

जितेंद्रच्या या कृतज्ञता भावनेमुळे त्याने इतर विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श ठेवला आहे, ज्यामुळे त्यांच्यामध्ये शिकण्याची जिद्द निर्माण होईल व सामाजिक जाणीवेतून सहकार्याची भावना विकसित होईल.

# महात्मा गांधी (१८६९–१९४८)



## परिचय

गांधीजी एक भारतीय स्वातंत्र्यसेनानी, नेते आणि समाजसुधारक होते.
सर्व लोकांसाठी जीवन अधिक चांगले बनविणे, हा गांधींच्या जीवनातील हेतू होता.

## मुख्य शैक्षणिक उद्दिष्टे

- गांधीजींचा विश्वास होता की, शिक्षण म्हणजे केवळ दर्जा मिळविणे किंवा पैसे कमविणे नव्हे, तर शिक्षणाने त्या व्यक्तीला स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे.
- शिक्षण आम्हाला चांगले आणि वाईट दरम्यान भेदभाव करण्यासाठी सक्षम करते.
- गांधीवादी शिक्षण व्यवस्थेमुळे मन (बौद्धिक), शरीर (भौतिक) आणि आत्मा (धार्मिक) विकसित होते. सामान्य व्यवस्था केवळ मनाची काळजी घेते.
- निरंतर चौकशी आणि निरोगी जिज्ञासा हे कुठल्याही प्रकारचे शिक्षण घेण्याची सर्वात पहिली गरज आहे.
- शिक्षणाच्या माध्यमातून चरित्र निर्माण (नैतिक मूल्यांचा अवलंब करून जसे सत्य, अहिंसा, धर्मादाय) करणे ही गांधींच्या दृष्टीने प्रमुख बाब होती.

## गरज

- शिक्षणाचे गांधी मॉडेल हे नोकरी–केंद्रीत, मूल्य आधारित आणि मास ओरिएंटेड आहे – ज्ञान हे क्रिया आणि व्यावहारिक अनुभवांशी संबंधित असणे आवश्यक आहे. हे सर्व स्तरावर बौद्धिक व्यायामासह अभ्यासक्रमात केंद्रबिंदू म्हणून उपलब्ध आहे. गांधीजींच्या मते, शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकाचे आश्रयस्थान असलेल्या डोमेनमध्ये राहण्यासाठी नव्हे.
- वाढत्या सुशिक्षित बेरोजगार पुरूष आणि स्त्रियांच्या गंभीर समस्यांसह शिक्षणाच्या संदर्भात गांधीजींच्या मनात असलेल्या शैक्षणिक व्यवस्थेची पुनर्रचना २१व्या शतकाची गरज असल्याचे दिसते. ही पुनर्रचना नंतर मनुष्यबळाला एका योग्य दिशेकडे मार्गी लावेल.
- गांधीजींच्या मते, शिक्षणामुळे सर्वात गरीब खेड्यातील व्यक्तीसुद्धा त्याच्या गरजा पूर्ण करेल इतका सक्षम व्हावा. त्यामुळे खेड्यातील व्यक्तींना उत्तम शिक्षण मिळण्यासाठी विद्यापीठांना खेड्यामध्ये नेण्यात यावे.

## उपाय

**१. व्यावसायिक शिक्षण**

गांधीजींनी व्यावसायिक आणि कार्यात्मक शिक्षणावर भर दिला, जो शिकण्यासाठी एक चांगला मार्ग आहे. 'शिका आणि कमवा' हा या शिक्षणाचा उद्देश होता. यामुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता वाढेल.

गांधीजींना भारतीय खेड्याला स्वयंपूर्ण एकक बनवायचे होते म्हणून त्यांनी असे प्रतिपादन केले की व्यावसायिक शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्षमता वाढवावी, ज्याने गावात स्वयंपूर्ण एकक म्हणून काम केले पाहिजे.

**२. मोफत प्राथमिक शिक्षण**

गांधीजींनी ७ ते १४ वयोगटातील सर्व मुला–मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण दिले. विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर त्यांच्या मातृभाषेत शिक्षण दिले पाहिजे.

**३. समुदाय सहभाग**

गांधीजींच्या शिक्षणाच्या योजनेचा असा विचार आहे की, शाळा आणि समुदाय यांचे एकीकरण होईल यामुळे मुलांमध्ये सामाजिक भान आणि सहकाराची भावना निर्माण होईल.

## शिक्षकांची भूमिका

- आपल्यापैकी प्रत्येकाच्या आत्म्यामध्ये चांगले गुण अंतर्भूत आहेत, जे शिक्षकांनी हेरले पाहिजेत. शिक्षक नेहमी शिकण्यासाठी आणि प्राविण्यतेपासून ते परिपूर्णतेपर्यंत वाढण्यासाठी तयार असावेत.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत शैक्षणिक संबंध प्रस्थापित केले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांसोबत एक होवून त्यांना शिकवण्यापेक्षा त्यांच्याकडून अधिक जाणून घेतले पाहिजे. जो शिक्षक स्वत:ला आपल्या विद्यार्थ्यांचा विद्यार्थी मानतो तोच खरा शिक्षक आहे.
- गांधीजींना विश्वास होता की, विद्यार्थ्यांना कोणतीही शिक्षा दिल्याने ते सुधारत नाहीत तर ते कठोर बनतात.
- त्यांच्या मते, साहित्यिक शिक्षणाचा शिक्षणामध्ये समावेश असावा, ज्यामुळे मानव व पशु किंवा श्वापदे यांमधील तफावत विद्यार्थ्यांना उघडपणे कळते.
- १९१७ साली अहमदाबाद येथे त्यांनी आपली पहिली प्रायोगिक शाळा, नॅशनल गुजराती शाळेची स्थापना केली.

## फायदे

- क्राफ्ट/कौशल्य केंद्रित शिक्षण (शेती, वीण, सुतारकाम आणि इतर अनेक कौशल्यांद्वारे) यामुळे क्रिएटीव्हीटी निर्माण होते आणि सेल्फ–एक्सप्रेसच्या माध्यमातून थेअरी आणि मोनोटोनस शिकणे यांमध्ये समतोल राखला जातो.
- यामुळे शिक्षण अधिक–शैक्षणिक किंवा पुस्तकस्वरूपी बनविण्याच्या धोक्यात संतुलन साधण्यास मदत होईल तसेच कौशल्य आणि श्रमिक कामासाठी आणि सन्मानाबद्दल सकारात्मक दिशेने वाटचाल करेल.
- यामुळे मॅन्युअल आणि बौद्धिक कौशल्यांमधील भेदभाव कमी करण्यास मदत होईल तसेच सामाजिक अर्थपूर्ण कामासाठी मिळालेल्या आदराच्या माध्यमातून शहरी आणि ग्रामीण भारतीयांच्या गरजा पूर्ण होतील.
- उत्पन्नाच्या शाश्वत स्त्रोताच्या माध्यमातून मिळालेल्या योग्य उदरनिर्वाहाच्या कमाईबद्दल गर्व वाटेल आणि सामुदायिक उपक्रमांमुळे सहकारी सोसायट्या व सूक्ष्म उद्योगांना चालना मिळेल.

## आमची उद्दिष्टे

* सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
* सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
* सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत...



**माया गोकुळ सोनवणे — B. Pharm (1st Year)**

मी एक खेडेगावातील मुलगी. मुलगी म्हटले की सर्व गोष्टींची बंधने येतात, दुय्यम वागणूक दिली जाते. माझे वडील शेतकरी असूनदेखील त्यांना शिक्षणाचे महत्त्व असल्यामुळे माझ्या शिक्षणाकडे ते दुर्लक्ष करीत नाही. पण उच्चशिक्षण म्हटले की खर्च जास्त असल्यामुळे आर्थिक अडचण जाणवायला लागली. अशा वेळेस मा. सुरेशदादांनी एसडी–सीडच्या माध्यमातून आर्थिक मदतीचा हात देवून जणू शिक्षणाचा राजमार्गच माझ्यासाठी उघडा करून दिला. एसडी–सीडच्या या मदतीमुळे माझ्यासारख्या हजारो विद्यार्थ्यांना ठरविलेल्या ध्येयापर्यंत पोहचण्यास मदत होणार आहे. तसेच त्यांच्या प्रेरणेने मलाही असे वाटते की मीसुद्धा खूप यशस्वी व्हावे व गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मदत करावी म्हणजे त्यामुळे या उपक्रमाचे सार्थक होईल.

---



**जयेश श्रीराम मोराणकर — Diploma Mechanical (2nd Year)**

या जगात देव अशा काही लोकांना मानवाच्या कल्याणासाठी समर्पित करतो की ज्यामुळे कोमेजलेल्या पंखात बळ उभे राहते आणि पंख आकाशाच्या दिशेने झेप घेवू लागतात. या पंखांना बळ देणारे आमचे मा. सुरेशदादा जैन. ज्यांच्या या एसडी–सीड उपक्रमातून माझ्यासारख्या कित्येक जणांना शिकून उत्तम व्यक्ती होण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. माझ्यासाठी ही शिष्यवृत्ती तर एक वरदानच ठरली आहे. मला पैसे नसतांना महागडी पुस्तके घेण्यासाठी, कॉलेजची फी भरण्यासाठी माझ्या संकटसमयी एसडी–सीड धावून आली. तेव्हा वाटले की आपण एकटे नाहीत. मा. दादांसारखे दानशूर, मोठ्या मनाचे, ज्यांना या समाजातील प्रत्येक विद्यार्थी पुढे जावा ही तळमळ आहे हे आपल्या पाठीशी आहेत. मी सुध्दा हा उपक्रम पुढे चालू राहावा म्हणून माझे सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे.

---



**प्राची सुभाष पाटील — BE E&TC (3rd Year)**

मला मागील दोन वर्षापासून एसडी–सीड शिष्यवृत्तीचा लाभ मिळत आहे. मी डिप्लोमाला असतांना माझ्या वडीलांचे निधन झाले. घरात कोणीही कमावणारे नाही. सर्व जबाबदारी आईवरच आली. गुणवत्ता असूनही आर्थिक अडचण निर्माण झाल्यामुळे निराशा आली. पुढचे शिक्षण कसे करावे हा मोठा प्रश्न मनात आला. अशातच एसडी–सीडची शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे मला शालेय पुस्तके, स्टेशनरी, कॉलेजची फी भरण्यासाठी आधार मिळाला. खऱ्या अर्थाने मला माझ्या आयुष्यात काही तरी मोठं बनण्याची प्रेरणा ही खरी एसडी–सीडमुळेच मिळाली आहे.

हा उपक्रम सुरू केल्याबददल मा. सुरेशदादांचे मी मनापासून आभार मानते आणि हा उपक्रम असाच सुरू राहावा, ही अपेक्षा बाळगते.


## भावपूर्ण श्रद्धांजली



कै. श्री. संदिपजी पगारीया
सदस्य, गव्हर्निंग बोर्ड
मृत्यू दिनांक: ३१.०१.२०१८

मागील दहा वर्षापासून एसडी–सीडच्या बांधणीपासून ते प्रगतीच्या उंच शिखरावर पोहचविण्यासाठी आपली बहुमोल साथ लाभली. आपले मिळालेले मार्गदर्शन व नवविचारांची शिदोरी एसडी–सीडला नवीन क्षितीजे पादाक्रांत करण्यासाठी महत्वपूर्ण ठरतील. आपली उणीव नक्कीच जाणवेल. आपल्या जाण्यामुळे जी पोकळी निर्माण झाली आहे ती कोणीही भरूण काढणे शक्य नाही.

**शोकाकूल,**
**एसडी–सीड परिवार, जळगाव**



कै. प्रा. एस. बी. चौधरी
सदस्य, सल्लागार समिती
मृत्यू दिनांक: १४.०१.२०१८

SD SEED
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**HEAD OFFICE:**
7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India.
Tel: (0257) 2235254 | Fax: (0257) 2234258 | Website: www.sdseed.in